Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

Original Article

व्हिग इतिहासकारांनी केलेल्या भारतीय राष्ट्रवादाच्या मांडणीचे चिकित्सक विश्लेषण

डॉ. विजय पुंडलिक साळुंखे
सहाय्यक प्राध्यापक, प्रताप महाविद्यालय, अमळनेर

Manuscript ID:
JRD -2026-180741
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 7
Pp. 196-198
July- 2026
Submitted: 16 June. 2026
Revised: 26 June. 2026
Accepted: 11 July. 2026
Published: 31 July. 2026

सारांश

भारतात प्रांतिक राजकारणातूनच भारतीय राष्ट्रवादाचा जन्म झाला असे मत नेमियरवादी आणि व्हिगच्या विचारांनी प्रभावित झालेल्या विचारकांनी मांडला. त्यामध्ये रजत कांत रे यांचा ग्रंथ "अर्बन रुटस् ऑफ इंडीयन नॅशनालिझम", ख्रिस्तोफर ॲलेन बेली यांचा ग्रंथ, "द लोकल रुटस् ऑफ इंडीयन पॉलिटीक्स: अलाहाबाद", डेव्हिड वाशब्रुक यांचा ग्रंथ "द इमरजन्स ऑफ प्रोव्हिन्सीयल पॉलिटीक्स: द मद्रास प्रेसिडेन्सी", जॉन हॉल यांनी संपादीत केलेला "द काँग्रेस अँन्ड इंडीयन नॅशनालिझम", बी. आर. टॉलमिनसन यांचा "द इंडीयन नॅशनल काँग्रेस अँन्ड द राज", ख्रिस्तोफर जॉन बेकर यांचा "द पॉलिटिक्स ऑफ साऊथ इंडीया", आणि गॉर्डन जॉनसन यांचा "प्रोव्हेन्सीयल पॉलिटीक्स अँन्ड इंडीयन नॅशनालिझम" या ग्रंथांमध्ये नेमियरवादी आणि व्हिग परंपरांचा विचार मांडण्यात आलेला दिसून येतो. या ग्रंथांमध्ये रजत कांत रे यांचा ग्रंथ अर्बन रुटस् ऑफ इंडीयन नॅशनालिझम अपवाद सोडल्यास इतर उर्वरीत सर्वच इतिहासकारांनी भारतीय राष्ट्रवादाला दुषणे दिली. एकूणच या लेखकांचा इतिहासाबद्दल विशेषत: भारताच्या इतिहासाबद्दलचा दृष्टीकोन पुर्वग्रहदुषीत होता. किंबहूना जॉन गॅलाघर आणि नेमियरच्या विचारांनी प्रभावित झालेल्या या लेखकांनी भारतात राष्ट्रीय जाणिवांचा अभाव होता. या तथ्यावर भर देवून भारतातील राष्ट्रवाद हा कोणताही राष्ट्रवाद नसून स्थानिक नेत्यांचे आपल्या वर्गीय जाणिवा जोपासण्यासाठीचे राजकारण होते. त्यांनी केलेल्या राजकारणाने या ठिकाणी कोणतीही जनमाणसाची चळवळ उभी राहीली नाही. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्याची चळवळ म्हणजे स्थानिक नेत्यांनी स्वत:च्या स्वार्थाकरीता केलेले राजकारण होते असा अन्वयार्थ या लेखकांनी मांडला. या विचारांचे चिकित्सक विश्लेषण प्रस्तुत लेखात मांडण्यात आले आहे.

मुख्य शब्द: *भारतीय राष्ट्रवाद, व्हिग इतिहासकार, नेमियरवादी विचार, प्रांतिक राजकारण, ब्रिटिश साम्राज्यवाद, राष्ट्रीय जाणीव, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, स्थानिक नेतृत्व, वसाहतीक शोषण, राजकीय संघटना, आश्रयदाता–आश्रित संबंध, फोडा आणि राज्य करा, राष्ट्रवादी चळवळ.*

प्रस्तावना

भारतात राष्ट्रीय राजकाराणाची निर्मिती 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात झाली. त्यापुर्वी सरकारसुध्दा प्रभावीपणे आपले कार्य करीत नव्हते. कारण सरकारने इ. स. 1857 च्या उठावानंतरच्या काळात भारतीयांमध्ये ब्रिटीश सरकारबद्दल रोष निर्माण होवू नये म्हणुन भारतीयांना सुधारणा देण्याकरीता विविध कायदे केले. त्यामध्ये 1857 चा कायदा, 1867 चा इंडीयन कौन्सील Act या कायद्यांनी भारतीयांना सुधारणा देण्याचा केवळ देखावा करण्यात आला. या कायद्यांचा मुलभुत उद्देश भारताला जबाबदार सरकार देण्याचा नसुन इंग्रजांचे हितसंबंध सुरळीत करण्यासाठीचे पाऊल होते. त्यातून जनमानसात ब्रिटीश सरकारविरोधात भावना निर्माण होवून त्यातून भारतात राष्ट्रीय जाणीवांनी आकार घेण्यास सुरुवात केली. तथापी जॉन स्ट्रचीने भारतविषयक जे लिखाण केले आहे त्यामध्ये तो म्हणतो की, "भारताबद्दल सर्वप्रथम आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट समजून घेणे आवश्यक आहे की, युरोपीय संकल्पनेनुसार भारत नावाचा एकसंध देश कधीही अस्तित्वात नव्हता.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. विजय पुंडलिक साळुंखे सहाय्यक प्राध्यापक, प्रताप महाविद्यालय, अमळनेर

How to cite this article:
साळुंखे विजय पुंडलिक (2026). व्हिग इतिहासकारांनी केलेल्या भारतीय राष्ट्रवादाच्या मांडणीचे चिकित्सक विश्लेषण. Journal of Research and Development, 18(7), 196–198. https://doi.org/10.5281/zenodo.22026042

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.22026042
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

तसेच, भारतात असा कोणताही एक देश नव्हता ज्यामध्ये भौगोलिक, राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक ऐक्य आढळते. "भारतीय राष्ट्र" अशी कोणतीही एकसंध संकल्पना नव्हती; विशेषतः आज ज्या "भारतीय जनता" (People of India) या संज्ञेचा वारंवार उल्लेख केला जातो, तशा अर्थाने एकसंध जनता अस्तित्वात नव्हती."[१]म्हणजे थोडक्यात भारताचे राजकिय ऐक्य नष्ट करण्याचा हा सम्राज्यवादी विचार होता. जरी राष्ट्राच्या युरोपीयन संकल्पनेनुसार भारत जरी एक राष्ट्र नव्हते तरी प्रेरणा, प्रतिकिया आणि संघर्षातून भारतात राष्ट्रीय जाणीवांचा उदय होत होता. कारण इ. स. १८५० नंतरच्या काळात भारतात राजकिय संघटनांचा उदय होण्यास सुरुवात झाली होती आणि भारत हे एक राष्ट्र आहे या जाणिवेची ही सुरुवात होती. हा राष्ट्रवाद उदयास येत असतांनाच त्याला कुपलंडने "ब्रिटीश राजवटीचे अपत्य"[२] असे म्हटले. असे असले तरी कोणत्याही प्रकारे कुपलंडच्या या विधानाचे समर्थन करता येण्यासारखे नाही. कारण जर भारतीय राष्ट्रवाद ब्रिटीश राजवटीचे अपत्य होते तर भारतात ज्या ब्रिटीशविरोधी चळवळी निर्माण झाल्या त्या दळपून टाकण्याचे प्रयत्न ब्रिटीशांनी वारंवार केले. म्हणजे अपत्याचा गळा दाबण्याचा हा प्रयत्न होता. जर भारतीय राष्ट्रवाद हे अपत्य होते तर अपत्याला दुध पाजण्याचे काम आईने केले पाहिजे होते. मात्र त्या अपत्याचा गळा दाबण्याचा प्रयत्न कायमच करण्यात आला. म्हणुन कुपलंडचे हे विधान म्हणजे भारतीयांचे ब्रिटीश धोरणांना समर्थन प्राप्त करण्याचा प्रकार होता.

भारतात प्रांतिक राजकारणातून राष्ट्रवादाचा उदय झालेला आपणास दिसून येतो. कारण ब्रिटीशांनी मुंबई इलाख्यावर राज्य स्थापन केल्यांनंतर या भागात प्रशासनाकरीता त्यांनी मुंबई या ठिकाणी अनेक कार्यालये स्थापन केली. याच काळात मुंबई शहराचा विकास राजधनाची शहर म्हणुन झाला. नव्या राजकिय व्यवस्थेने निर्माण केलेल्या प्रशासकिय संस्थांशी एतद्देशियांचा जवळचा संपर्क आला. याच संपर्कातून स्थानिक नेतृत्वाच्या उदयाची पार्श्वभुमी तयार झाली. तरही ही व्यवस्था वाशबुक यांच्या म्हणण्याप्रमाणे "राजकीय व्यवस्था ही "दरबारी राजकारण" (Court Politics) या संज्ञेने सर्वाधिक योग्य प्रकारे वर्णन करता येईल. ती परस्परांशी जोडलेल्या **आश्रयदाता–आश्रित (Patron–Client)** संबंधांच्या मालिकेवर आधारित होती. या संबंधांद्वारे आर्थिक संसाधने, तसेच कार्यकारी (Executive) आणि न्यायिक (Judicial) निर्णय विविध स्तरांपर्यंत पोहोचविले जात."[३] त्यातून आश्रयदाता आणि आश्रीत अशा संबंधावर अधारीत सुशिक्षीत मध्यमवर्गाचा उदय झाला. या वर्गाने प्रारंभिक काळात ब्रिटीशांच्या धोरणांचे समर्थन केले. कारण आपल्याकरीता ब्रिटीशांकडून काही लाभ मिळवून घेता येतील अशी मानसिकता यामागे या आश्रयदाता वर्गाची होती. ब्रिटीश शासनांच्या अधिकाऱ्यांशी जवळीक साधल्यामुळे त्यांना अशा प्रकारचे लाभ मिळविता आले. यामध्ये विविध वर्गांनी विविध प्रकारे सरकारच्या जवळ जावून आपले वर्गीय लाभ आपल्या पदरी पाडून घेण्याचा प्रयत्न केला.

मुंबई इलाख्यात किंबहुना भारतात निर्माण झालेला बुध्दीवादी वर्ग ब्रिटीश शासनाची देणगी होती. म्हणुन ब्रिटीश शासन म्हणजे भारताला मिळालेले वरदान आहे असे मानण्यात हा वर्ग धन्यता मानत होता. मात्र या वर्गाला जेव्हा वसाहतीक शोषणाचे चटके सहन करावे लागले तेव्हा त्यांनी ब्रिटीश सरकारविरोधात वैचारीक जागृती घडवून आणण्याचे कार्य केले.[४] तथापी हा बुध्दीवादी वर्ग इंग्रजी शिक्षण घेवून शहरात निर्माण होण्यास सुरुवात झाली होती. या वर्गाने आपले हितसंबंध जोपासण्यासाठी आपल्या स्वत:च्या हक्कांसाठी आपल्या संघटना निर्माण करण्यास सुरुवात केली होती. त्यामध्ये 'मुंबईत जगन्नाथ शंकरशेठ, भाऊ दाजी लाड आणि दादाभाई नौरोजी यांच्या पुढाकाराने २६ ऑगस्ट १८५२ रोजी बॉम्बे असोशिएशन ची स्थापना झाली.'[५] या संस्थेने व नंतर ' इ. स. १८६६ मध्ये दादाभाई नौरोजींनी निर्माण केलेल्या ईस्ट इंडीया असोशिएशन या संस्थेने , बाम्बे प्रसिडेन्सी असोशिएशन या संस्थेने, पुण्याच्या सार्वजनिक सभेने, डेक्कन सभेने आणि सामाजिक परिषदेने [६] लोकांच्या हक्कांकरीता आपले स्वत:चे व्यासपीठ निर्माण केले. मात्र या संघटनांचे सभासद हे ब्राह्मण, गुजराती आणि पारशी बहूसंख्य होते. या करीता "व्यापाऱ्यांना जिव्हाळा वाटणाऱ्या कापूस कायदा, आयात मालावरील जकात, इत्यादी प्रश्नांना विशेष महत्व दिले. सर्वसामान्य महाराष्ट्रीय जनतेच्या दु:खाची त्यांनी फारसी दखल घेतली नाही."[७] म्हणजे केवळ पुढारी जातीपूरते कींवा आपले हितसंबंध जोपासण्यासाठीच या संस्थांचा वापर करीत होते त्यामध्ये राष्ट्रभावना दिसून येत नाही. तथापी या काळात सबंध भारतभर असंतोष होता, मुंबई इलाख्यात तर सावकारांनी केलेल्या पिळवणूकीतून दख्खन दंगे म्हणुन ओळखला जाणारा उठाव निर्माण झाला. या उठावाला सुरुवात पुणे जिल्ह्यातून झाली असली तरी संबंध मुंबई इलाख्यात शेतकऱ्यांचे हे विद्रोह घडून आले. या विद्रोहांच्या काळात पुण्याच्या "सार्वजनिक सभेने जागोजाग आपले प्रतिनिधी पाठवून माहिती गोळा केली व विस्तृत अहवाल प्रसिध्द केले. या बाबतीत सरकारलाही आपले धोरण ठरवितांना सार्वजनिक सभेच्या कामाचा बराच उपयोग झाला. गणेश वासूदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका, सदाशिव बल्लाड गोवंडे, शिवराम हरी साठे, सीताराम हरि चिपळूणकर"[८], या कार्यकर्त्यांची संघटनेला जन आक्रोशाकडे नेण्याची भुमिका महत्वाची होती. प्रारंभिक काळात या संघटनांनी केलेले

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

कार्य आणि संघटनांनी जनतेच्या प्रश्नांची उकल केल्यामुळे त्यांना मिळणारा वाढता पाठींबा यामुळे स्थानिक नेत्यांनी जनतेच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रीत करण्यास सुरुवात केली. त्यामुळे या संघटनांविषयी असलेले अनिल सिल यांचे भाष्य विचारात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात "भारतातील सुरुवातीच्या संघटना भाषा, विशिष्ट हितसंबंध किंवा मर्यादित भौगोलिक क्षेत्र यांपुरत्याच मर्यादित होत्या. त्यांना मुख्यतः विद्यार्थी, व्यावसायिक, जमीनदार किंवा व्यापारी वर्गाचा पाठिंबा मिळत असे. मात्र ब्रिटिश सत्तेने निर्माण केलेल्या प्रशासकीय आणि राजकीय एकात्मतेमुळे अधिक व्यापक उद्दिष्टे असलेल्या संघटनांना प्रादेशिक सीमा ओलांडून कार्य करणे शक्य झाले. अशा प्रकारे प्रांतीय संघटनांचा उदय झाला. या संघटनांनी संपूर्ण भारताच्या पातळीवर एकत्रितपणे कार्य करण्याचे मार्ग शोधण्यास सुरुवात केली आणि या प्रक्रियेची परिणती अखेरीस भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत झाली."[९] म्हणजे सिलने पुन्हा सम्राज्यवादाला खतपाणी घालणारे विचार यातून मांडले. कारण त्यांनी आपले मत मांडतांना केवळ प्रशासकिय आणि राजकिय ऐक्य ब्रिटीशांनी घडवून आणल्यामुळे राष्ट्रीय विचारांची जाण भारतीयांना झाली. मात्र सिलचा हा दृष्टीकोन व्हिगच्या विचारांनी प्रभावीत होता आणि त्याला सम्राज्यवादाचे वलय होते. कारण जर ब्रिटीशांनी भारतात राजकिय एकता निर्माण केली तर १८९३ नंतरच्या काळात ब्रिटीशच भारतात हिंदू आणि मुसलमानात फुट पाडण्यास आणि त्यांच्यातील ऐक्याच्या भावनेस तडा देण्यास कारणीभूत ठरलेले दिसतात. हिंदू मुसलमानांमध्ये एकी होवू नये म्हणुन मुस्लिमांना या काळात सुधारणा देण्याचा आणि मुस्लिमांना प्रमाणाबाहेर प्रतिनिधीत्व देण्याच्या धोरणाला कर्झन मोर्ले, मिंटो यांनी खतपणी घातले. त्यामुळे एकतेचा पुरस्कार ब्रिटीशांनी कधीच केला नाही. या उलट सम्राज्यवाद वाढवितांना ब्रिटीशांनी फोडा आणि राज्य करा या सम्राज्यवादी धोरणाचा अवलंब केला. विशेष म्हणजे रजत कांत रे यांनी आपला ग्रंथ लिहतांना साधनांचा आधार घेवून असा युक्तीवाद मांडला की, "ब्रिटिश साम्राज्याचे हितसंबंध आणि भारतीय राष्ट्रवादी आकांक्षा यांच्यामध्ये मूलभूत विरोध होता. हा विरोध कलकत्ता महानगरपालिकेच्या राजकारणात युरोपीय व्यापारी समाज आणि भारतीय व्यापारी तसेच व्यावसायिक गट यांच्यातील संघर्षाच्या स्वरूपात स्पष्टपणे दिसून येत होता. अल्पकालीन आणि मर्यादित उद्दिष्टांसाठी काही वेळा सहकार्य झाले असले, तरी दीर्घकालीन दृष्टीने हा विरोध समेट न होणारा ठरला."[१०] म्हणुनच युरोपीयन किंबहूना ब्रिटीश इतिहासकारांचा दृष्टीकोन हा सम्राज्यवादाच्या गृहितकांचे पोषण करणारा होता. त्यांनी आपल्या लिखाणातून भारतीय राष्ट्रवादी विचारांची पायमल्ली केली.

संदर्भ

1. Strachey John, India, London kegan Paul Trench Trobner & Co. London, Revised Edition Oct, 1888, P. 5.
2. Coupland R. , The Indian Problem, 1833- 1835, Oxford University Press, Humphrey Milford, 1915, P. 23.
3. Washbrook D. A., The Emergence of Provincial Politics, The Madras Presidency 1870- 1920, Cambridge University Press, London, 1976, P. 216.
4. रॉय सत्या एम (संपा.), भारत में उपनिवेशवाद और राष्ट्रवाद, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, पुर्नमुद्रण, 2013, पृ. 138.
5. चौधरी के. के. , आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, १८१८-१९४७, खंड पहिला, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०१५ए पृ. ३४९.
6. उपरोक्त, पृ. ३४९-३७०.
7. पंडीत नलिनी, महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास, नलिनी पंडीत, १९५५, मुंबई, पृ. ५३.
8. उपरोक्त, पृ. ५३.
9. Seal Anil , The Emergence of Indian Nationalism Competition and Collaboration in the Leter Nineteenth Century, Cambridge, University Press, 1971, Cambridge, P. 195.
10. Ray Rajat, Urban Roots of Indian Nationalism, Vikas Publishing House, New Delhi, P. 228